**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स गोकुळ माऊली शुगर लिमिटेड, मुक्काम पोस्ट- त डवळ, तालुका-अक्कलकोट, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार ४,५०० मे. टन प्रतिदिन ते ७,५०० मे. टन प्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती प्रकल्प १४.८५ मेगावॅट प्रतिदिन वरुन ३० मेगावॅट प्रतिदिन पर्यत आणि प्रस्तावित नवीन मोलॅसिस/केन ज्युसवर आधारित आसवणी प्रकल्प - ११० किलो लिटर प्रतिदिन स्थापना संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत –**

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स गोकुळ माऊली शुगर मिल्स लिमिटेड, मुक्काम पोस्ट-ताडवळ, तालुका-अक्कलकोट, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार ऊस गाळप क्षमता विस्तार ४,५०० मे. टन प्रतिदिन ते ७,५०० मे. टन प्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती प्रकल्प १४.८५ मेगावॅट प्रतिदिन वरुन ३० मेगावॅट प्रतिदिन पर्यत आणि प्रस्तावित नवीन मोलॅसिस/केन ज्युसवर आधारित आसवणी प्रकल्प - ११० किलो लिटर प्रतिदिन प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ रोजी सकाळी १२.३० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास गुरुवार, दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ रोजी मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई - ८९ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२११०१३-एफटीएस-००५७ दिनांक १३-१०-२०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी,सोलापूर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| **२)** प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) | - | **सदस्य** |

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **आयोजक**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,

सोलापूर

श्री अजित वसंतराव पाटील, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सोलापूर तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सौ. क्षमा पवार, अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री नितीन शिंदे, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी सांगितले कोविड-१९ संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांनुसार बैठकीच्या स्थानी एकावेळी फक्त १०० व्यक्तींनाच एका सत्रात परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास त्यांना पुढील सत्रात संधि देण्यात येईल व सर्व उपस्थितांना जनसुनावणी बैठकीत संधि मिळेपर्यंत बैठक चालू ठेवण्यात येईल. आयोजक यांनी पुढे सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली. आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री पाटील, आयोजक यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मेसर्स प्रकल्प प्रवर्तक मेसर्स गोकुळ माऊली शुगर मिल्स लिमिटेड, मुक्काम पोस्ट-ताडवळ, तालुका-अक्कलकोट, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र यांचा कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार ४,५०० टन प्रतिदिन ते ७,५०० मे. टन

प्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती प्रकल्प १४.८५ मेगावॅट प्रतिदिन वरुन ३० मेगावॅट पर्यंत आणि मोलॅसिस/केन ज्युसवर आधारित प्रकल्प विस्तारिकरण आणि प्रस्तावित नवीन आसवणी प्रकल्प - ११० किलो लिटर प्रति दिन प्रकल्पांच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प हा घोषित औद्योगिक विभाग क्षेत्राबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये सर्व उत्पादनांसाठी एकत्रित - **श्रेणी अ मध्ये** [साखर उत्पादनासाठी - ५ (जे), मळी आधारित आसवणी प्रकल्पासाठी - ५ (जी) व सहविद्युत प्रकल्पासाठी - १ (डी)] मोडत आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि जल वायू परिवर्तन विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची ऑनलाईन परवानगी दिनांक ०५-०६-२०२१ रोजी मागितली व सदरहू विभागाने दिनांक १०-०८-२०२१ रोजी त्यास मान्यता देण्यात आली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एंक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, सोलापूर यांनी स्थानिक वृतपत्र दैनिक संचार यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक १८ सप्टेंबर, २०२१ रोजी जाहिर जनसुनावणी सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल यांच्या प्रती विभागीय कार्यालय - पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय - सोलापूर, मा. अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालय - सोलापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - सोलापूर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र - सोलापूर, तहसीलदार, तहसील कार्यालय-अक्कलकोट, जिल्हा - सोलापूर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती अक्कलकोट, तालुका-अक्कलकोट, जिल्हा-सोलापूर, ग्रामसेवक/सरपंच, ग्रामपंचायत, कार्यालये - मौजे- केगाव (ख), मुंढेवाडी, म्हैसलगे, देवीकवठे, करजगी, मंगरुळ, तडवळ, तालुका-अक्कलकोट, जिल्हा - सोलापूर, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन,

नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय - मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - पुणे, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - सोलापूर व मप्रनि मंडळाच्या संकतेस्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की सदरहू प्रकल्पाबाबत स्थानिक उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, सोलापूर यांना ईमेलव्दारे दुस-या राज्यातून दोन व्यक्तींच्या सूचना आणि प्रकल्पास पाठिंबा दर्शविणा-या प्राप्त झालेल्या असून आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात सादरीकरणानंतर देऊ शकतात असे सांगितले. आयोजक यांनी मा. अध्यक्षांच्या वतीने पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण करण्याची सूचना केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी पर्यावरणविषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत माहिती देताना सांगितले की प्रकल्प प्रवर्तक विविध पर्यावरण संरक्षण सयंत्रणेसाठी भांडवली गुंतवणूक एकूण रुपये १,९४५/-लाख करणार असून वार्षिक देखभाल व दुरुस्तीसाठी २९०.० लाख खर्च करणार आहेत. त्यांनी प्रकल्पातील आपत्कालीन व्यवस्था आणि हरित पट्टा विकसनाबाबत संपूर्ण माहिती सांगितली. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प असेल. प्रकल्पातील हवा प्रदूषणाच्या संरक्षणासाठी अत्यंत आधुनिक अशी इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर अशी सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. सदरहू प्रकल्प विस्तारिकरणामुळे स्थानिकांना प्रत्यक्ष रोजगाराची संधि मिळणार असून परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात भरपूर फायदा होणार आहे. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले सदरहू प्रकल्प विस्तारिकरण कार्यरत प्रकल्प स्थानावरच करणार असल्याने विस्तारिकरणासाठी अतिरिक्त जमिन लागणार नाही. ऊसामध्ये ७५% पाणी असते. उत्पादन प्रकियेत उत्पन्न् झालेले सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा उत्पादनात पुनर्वापर करण्यात येणार आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे आक्षेप, सूचना, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. प्रश्नकर्त्याने आपले संपूर्ण नांव व पता सांगण्याची सूचना केली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

खालील व्यक्तींनी चर्चेत भाग घेतला-

१) **श्री सैफन पटेल, खानापूर, तालुका- अक्कलकोट, जिल्हा-सोलापूर-**

सदरहू विस्तारिकरण प्रकल्पामुळे स्थानिक शेतक-यांना काय फायदा होईल? तसेच विस्तारिकरण पूर्ण झाल्यानंतर आम्हां शेतक-यांचा ऊसाला दिला जाणार दर वाढणार का?आसवणी प्रकल्प काही कारणांमुळे जर उत्पादन थांबले, तर काय परिणाम होतील?

**उत्तर -** प्रकल्प प्रवर्तकांच्या वतीने पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की या प्रकल्पामुळे शेतक-यांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या फायदा होणारच आहे. सदरहू आसवणी प्रकल्पातील स्प्रे ड्रायरमधून निघणा-या स्पेंट वॉशच्या पावडरमध्ये शेतजमिनीस उपयुक्त असे नायट्रोजन, फॉस्फेट, पोटॅश सारखे मूलद्रव्ये असल्यामुळे त्याचा ठराविक प्रमाणात शेतात टाकल्यावर त्याचा खतासारखा फायदा होतो. थोडक्यात त्या पावडरमध्ये एन.पी.के. घटकांचा समावेश असल्यामुळे शेतीस फायदा होईल. प्रति एकरी १५० ते २०० किलो सदरह स्पेंट वॉश पावडर वापरल्यास शेतीतील पीकांचे उत्पादन वाढते.

ऊसाच्या वाढीव दराबद्दल प्रकल्प प्रवर्तक म्हणजेच कारखान्याचे चेअरमन यांनी असे उत्तर दिले की सदर प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ऊसाला वाढीव दर मिळू शकतो, कारण सदर प्रकल्पातून फायदेशीर असे इथेनॉल सारख्या जास्त मागणी व जास्त बाजारभाव असलेल्या घटकाची निर्मिती होईल. जेणेकरुन त्याचा अप्रत्यक्षरित्या फायदा शेतक-यांना मिळेल.

आसवणी प्रकल्प काही कारणांमुळे जर उत्पादन थांबले, तर काय परिणाम होतील, या प्रश्नांवर असे उत्तर दिले की सदर प्रकल्प हा आसवणी/डिस्टिलरी असल्यामुळे जरी ऊसाचा हंगाम संपला, तरी ती वर्षातून ३३० दिवस चालविता येऊ शकते. म्हणून उत्पादन थांबणार नाही. तदनंतर प्रकल्प सल्लागाराने असेदेखील सांगितले की नोव्हेंबर ते मार्च या पाच महिन्यांच्या काळात साखर कारखान्यातून निर्माण होणा-या ऊसाच्या रसापासून थेट इथनॉल निर्मिती करण्याचे अत्याधुनिक तंत्रज्ञान हया प्रकल्पात आहे. तसेच एप्रिल ते ऑक्टोबर या

काळातदेखील डिस्टलरी गळीत हंगामात निर्माण झालेल्या मोलॅसिसचे साठवणूक करुन इथेनॉलची निर्मिती करण्यात येऊ शकते. सबब डिस्टीलरी प्रकल्प वर्षातून ३३० दिवस चालवता येऊ शकतो.

२) <u>श्री समिर शेख,करले-कर्जाल, तालुका- अक्कलकोट, जिल्हा-सोलापूरः-</u>

सदर प्रकल्पामुळे निर्माण होणा-या प्रदूषण नियंत्रणासाठी काय उपाययोजना योजिल्या आहेत?

**उत्तर - जल प्रदूषण नियंत्रण** - प्रकल्प प्रवर्तकांच्या वतीने पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की सादरीकरण दरम्यान या सर्व बाबी सांगण्यात आल्या होत्या. सदर प्रकल्प हा शून्य द्रव निःषकासन/निःस्सारण स्वरुपाचा म्हणजेच झिरो लिक्विड डिस्चार्ज (ZLD) आहे. विस्तारित साखर कारखान्यातून निर्माण होणा-या सांडपाण्यासाठी सद्यस्थितीतील सक्षम अशा औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (ETP) चा वापर होणार असल्याने तसेच नवीन येणा-या आसवणी प्रकल्पासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त ९८२ घनमीटर प्रति दिन नवीन कन्डेन्सेट पॉलिशिंग युनिट (C.P.U.) उभारल्या नंतर जलप्रदूषणाचा प्रश्न निकाली निघेल. तसेच डाईकी एक्सिस जोकासू या जपानी तंत्रज्ञानाचा पॅकेज एस.टी.पी. (S.T.P.) सुध्दा उभारणे प्रस्तावित आहे.

**हवा प्रदूषण नियंत्रण** -सद्यस्थितीत १०० टन प्रति तास क्षमतेचा बॉयलर कार्यान्वित आहे. विस्तारिकरणानंतर नविन १०० टन प्रति तास क्षमतेचा बॉयलर उभारला जाईल व त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असा नवीन इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपिटेटर (ESP) उभारला जाईल व जुना व नवीन बॉयलरसाठी सद्यस्थितीतील ८५ मीटर उंचीच्या चिमणीचा वापर केला जाईल.

<u>घन कचरा, घातक घन कचरा, ध्वनि प्रदूषण नियंत्रण-</u>

विस्तारिकरणानंतर २४ मे.टन प्रति महिना इ.टी.पी. स्लजचा खत म्हणून वापर होईल, २४ मे.टन प्रति महिना इ.टी.पी. स्लजचा खत म्हणून वापर होईल,१२६० मे.टन प्रति महिना राखेचा (बगॅसचा) वीटनिर्मिती/खत म्हणून वापर होईल, ६०० मे.टन प्रति महिना यीस्ट स्लजचा खत म्हणून वापर होईल, ६० मे.टन प्रति महिना सी.पी.यु. स्लजचा खत म्हणून वापर होईल.

तसेच १.० मे.टन प्रति वर्षे घातक घन कचरा स्वरुपात वर्गीकृत अशा स्पेंट ऑईलची, ०.५ मे.टन प्रति वर्षे घातक कंटॅमिनिटेड कॉटन वेस्ट , ४५ नंबर प्रति वर्षे कंटॅमिनिटेड रिकामे कंटेनरची विल्हेवाट अधिकृत पुनर्विक्रेत्याकडे केली जाईल.

तसेच ध्वनि प्रदूषण नियंत्रणासाठी आयसोलेशन, सेपरेशन, इन्सुलेशन, पीपीईज् व डी.जी. सेंट्ससाठी कॅनोपी व सायलेन्सरचा वापर केला जाईल.

३) **श्री महादेव चिपकळे,केगाव, तालुका- अक्कलकोट, जिल्हा-सोलापूरः-**

माझे या प्रकल्पास समर्थन आहे.

४) **श्री जगन्नाथ गायकवाड, मुंडेवाडी, तालुका- अक्कलकोट, जिल्हा-सोलापूरः-**

माझे या प्रकल्पास समर्थन आहे.

५) **श्री उमाशंकर मंगरुळे, तडवळ, तालुका- अक्कलकोट, जिल्हा-सोलापूरः-**

माझे या प्रकल्पास समर्थन आहे.

६) **श्री मधुबाबू, एनजीओ, हैद्राबादः-**

मी माझे समर्थन पत्र म.प्र.नि. मंडळाच्या सोलापूर कार्यालयास ईमेलव्दारे पाठवविले आहे. सदर विस्तारिकरण प्रकल्प होणे स्थानिकांच्या दृष्टीने गरजेचे आहे व सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. तथापि, माझ्या खाली नमूद केल्याप्रमाणे ३ सूचना आहेत -

अ) परिसरातील शेतकरी व इतर ग्रामस्थ यांना प्रकल्पात नोकरी/रोजगारासाठी प्राधान्य देण्यात यावे,

आ) हरितपट्टा जास्तीत जास्त विकसित करण्यात यावा,

इ) कारखान्याला सद्यस्थितीत नफा झाल्यानंतर नफ्याच्या २% इतका निधी / रक्कम, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधी (CSR) नियमांनुसार परिसरातील गावांचा/शेतक-यांचा/ स्थानिकांचा विकास करण्यासाठी खर्च करावा. तसेच, कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधी (CER) चा देखील वापर पर्यावरण संरक्षणासाठी करावा.

७) **श्री महानतेज देसाई,केगाव, तालुका- अक्कलकोट, जिल्हा-सोलापूरः-**

माझे या प्रकल्पास समर्थन आहे. ऊस गाळप क्षमता ४,५०० पासून ७,५०० मे. टन प्रति दिवस झाल्यामुळे स्थानिकांचा ऊस लवकारात लवकर गाळप होईल व शेतक-यांच्या ऊसाचे नुकसान होणार नाही. तसेच कारखाना एकरमी एफआरपी देणार असल्यामुळे शेतक-यांचे नुकसान होणार नाही, उलटतर्फी एकाच वेळेस सगळी रक्कम मिळाल्याने शेतक-यांचा फायदा होईल, तसेच परिसरातील रोजगारात वाढ होणार असल्याने माझे या प्रकल्पास समर्थन आहे.

८) **<u>श्री चौडाप्पा माशाळे, हिंगळगी, तालुका- दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-</u>** परिसरातील शेतक-यांना फायदा होणार असल्याने व परिसरातील रोजगारात वाढ होणार असल्याने माझे या प्रकल्पास समर्थन आहे.

९) **<u>श्री शिवानंद तेली, इंगळकी, कर्नाटक राज्यः-</u>**

आज मी माझ्या ऊसाची ट्रॉली घेऊन या कारखान्यात ऊस गाळपासाठी आलो आहे. मी या कार्यक्रमात सहभागी झालो व माझे या प्रकल्पास समर्थन आहे. (श्री शिवानंद तेली यांनी त्यांचे विधान कानडी भाषेत केले, तदनंतर शेजारील एका व्यक्तीने त्याचे मराठीत भाषांतर करुन सांगितले).

१०)**<u>श्री भीमाशंकर देसाई,म्हैसलगी, तालुका- अक्कलकोट, जिल्हा-सोलापूरः-</u>**

माझे या प्रकल्पास समर्थन आहे.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याची सूचना केली. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता. आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, सोलापूर यांना प्राप्त झालेले लेखी सूचना, आक्षेप बैठकीचे इतिवृत्त, अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण, वने आणि जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीच्या ३० दिवस अगोदर स्थानिक आणि राष्ट्रीय वृत्तपत्रात जाहिर सुचना देण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे अधिसूचित शासकीय कार्यालयात कार्यकारी सारांश अहवालाची मराठी आणि इंग्रजी प्रत उपलब्ध करण्यात आलेली होती. बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप, प्राप्त झालेले लेखी आक्षेप,बैठकीचे इतिवृत्त व बैठकीची संपूर्ण व्हिडिओ पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. पुढील निर्णय तेथील तज्ज्ञ समिती घेईल. सदरहू इतिवृत्त म.प्र.नि. मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल. त्यांनी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनवाणी समिती यांना बैठकीचा समारोप करण्याची विनंती केली.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनवाणी समिती यांनी गोकूळ माऊली शुगर लिमिटेडच्या जनसुनावणीसाठी उपस्थित असलेल्या सर्व उपस्थितांचे आभार मानले. त्यांनी

सांगितले की उपस्थित प्रश्न, सूचना, टीकाटिप्पणीस पर्यावरण सल्लागार यांनी समाधानकारक उत्तरे दिली आहेत. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात जनसुनावणीत चर्चा झाली. बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्दयांची नोंद घेण्यात आलेली असून त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. माननीय अध्यक्षा यांनी जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

प्रकल्पाच्या समर्थनार्थ 02 इमेलद्वारे प्राप्त झाले आहेत, सहपत्र सोबत जोडले आहे. जनसुनावणीला उपस्थित असलेल्या नागरिकांचा हजेरीपट जोडला आहे, सोबत सहपत्र.

**(अजित पाटील)**
आयोजक,
पर्यावरणविषयकजाहिर जनसुनावणी समिति
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
सोलापूर

**(नितीन शिंदे)**
सदस्य,
पर्यावरणविषयकजाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
पुणे

**(शमा पवार)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर,
जिल्हा-सोलापूर